# 'आशा'साठी
# पूरक प्रशिक्षण पुस्तक - ४



महाराष्ट्र शासन, आरोग्य सेवा,
'राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान'साठी

साथी प्रकाशन

# ‘आशा’साठी
# पूरक प्रशिक्षण पुस्तक - ४



**महाराष्ट्र शासन, आरोग्य सेवा,**

**‘राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान’साठी**

**साथी प्रकाशन**

# आभार


- *महाराष्ट्रातील केवळ कमी शिकलेल्या 'आशा'साठी नाही तर सर्व 'आशां'च्या प्रशिक्षणासाठी 'पूरक साहित्य' म्हणून या पुस्तकाची निवड केल्याबद्दल तसेच हे पुस्तक महाराष्ट्रातील सर्व आशांना देण्यासाठी त्याच्या ९००० प्रती घेण्याचा निर्णय घेण्याबद्दल श्री. मधुकर चौधरी, संचालक, 'राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान' महाराष्ट्र; डॉ. सतीश पवार, उपसंचालक, 'राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान' महाराष्ट्र; आणि श्रीमती वंदना कृष्णा, कमिशनर, कुटुंब कल्याण विभाग यांचे आभारी आहोत.*

- *या पुस्तकाच्या मसुद्याची छाननी करून त्यात काही ठोस सुधारणा सुचवल्याबद्दल डॉ. वाय. पी. मुळे यांचे आभार.*

- *चंद्रशेखर जोशी यांनी रेखाचित्रे काढून दिली आणि एन. आर. एंटरप्रायझेसने कमी वेळात छपाई करून दिली याबद्दल त्यांचे आभार.*

- *या पुस्तकाला आकार देण्यासाठी 'साथी'चे -*
  - *डॉ. नितीन जाधव, मकरंद पुरोहित, तृप्ती जोशी, भाग्यश्री खैरे, शकुंतला भालेराव, स्मिता नायर यांनी या पुस्तकाचा पहिला मसुदा बनवण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारे भरीव योगदान दिले;*
  - *डॉ. निलांगी नानल, डॉ. अभिजित मोरे यांनी वैद्यकीय मुद्दे तपासून दिले;*
  - *भाग्यश्री खैरे यांनी या पुस्तकाचा अंतिम मसुदा बनवण्याचे काम केले;*
  - *शारदा महल्ले यांनी नेहमीच्या आत्मियतेने संगणकावर जुळवणी केली;*

  *यासाठी त्यांचे आभार.*


***

# ‘आशा’साठी दोन शब्द




‘आशा’ म्हणून तुमची निवड झाली आहे याबद्दल तुमचे अभिनंदन! ‘राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान’ या २००५ पासून सुरु झालेल्या नव्या कार्यक्रमात काही राज्यांमध्ये प्रत्येक खेड्यात ग्रामीण आरोग्य कार्यकर्ती नेमण्याचे केंद्र सरकारने ठरवले. त्याचे अनेक संस्था संघटनांनी स्वागत केले कारण गेली कित्येक वर्षे निरनिराळ्या आरोग्य संघटनांनी सरकारकडे मागणी केली होती की प्रत्येक गावामध्ये एक आरोग्य- कार्यकर्ती नेमली जायला हवी. तुमच्या सारख्या आरोग्य कार्यकर्तीची खूप गरज आहे. कारण एकतर भारतामध्ये प्रत्येक गावात एखादा डॉक्टर जाऊन राहील असे होणे येत्या काही दशकात तरी शक्य नाही. दुसरे म्हणजे ज्या आजारांवर निदान सुरुवातीचे उपचार करण्यासाठी डॉक्टरांची गरज नसते अशा आजारांवर साधे उपचार करण्याचे काम आरोग्य-कार्यकर्ते व्यवस्थित करू शकतात असा अनेक ठिकाणचा अनुभव आहे. तिसरे म्हणजे गावातील लोकांना त्यांच्या आरोग्याबाबत सल्ला देणे, त्यांचे शंका - निरसन करणे, त्यांच्या मनातील भिती घालवणे हे महत्त्वाचे कामही आरोग्य कार्यकर्ते करू शकतात. या शिवाय सरकारी व खाजगी क्षेत्रात कोण-कोणत्या वैद्यकीय आरोग्य-सेवा मिळतात, त्या कशा मिळवायच्या, त्या मिळवतांना आपले मानवी हक्क कसे बजावायचे याचे गावातल्या लोकांना मार्गदर्शन करायचे कामही हे आरोग्य- कार्यकर्ते करू शकतात. ही कामे आपल्या गावातील लोकांसाठी करायचे आव्हान तुम्हा ‘आशां’ पुढे आहे. हे करण्यासाठी तुम्हाला नीट प्रशिक्षण मिळायला हवे. या प्रशिक्षणासाठी उपयोगी पडावे म्हणून हे पुस्तक तुमच्यासाठी बनवलेले आहे.

या पुस्तकाचे वैशिष्टय म्हणजे हे पुस्तक मुख्यतः चित्ररुप आहे. असे चित्ररुप पुस्तक बनवण्यामागचे कारण म्हणजे मुख्यतः लिखित स्वरूपातील पुस्तक तुम्हाला समजणे अवघड जाईल. कारण मराठीतून तुमचे शिक्षण झाले असले तरी मराठी ही तुमची मातृभाषा नाही. आदिवासी भागातील शाळांमध्ये मराठी फारसे नीट शिकवले जात नाही व मराठीत शिक्षण घेऊनही तुम्हाला बरीच वर्षे झाली आहेत. तसेच मधल्या काळात मराठी वाचनाची फारशी सवयही तुमच्यापैकी अनेकांना नसेल. शिवाय काही जणींचे शिक्षणही आठवीपर्यंत झालेले नाही. त्यामुळे विशेषतः आठवीपेक्षा कमी शिक्षण झालेल्यांसाठी मुख्यतः हे पुस्तक बनवले आहे. सार्वजनिक आरोग्य संस्था, नागपूर यांनी भाषांतरित केलेल्या ‘आशा प्रशिक्षण पुस्तिका क्र. ४’ या पुस्तकातील धडे या पुस्तकात चित्ररूपात मांडले आहेत. त्यामुळे हे पुस्तक ‘आशा प्रशिक्षण पुस्तिका क्र. ४’ ला पूरक आहे.

विशेषतः कमी शिकलेल्या आरोग्य कार्यकर्त्यांसाठी प्रशिक्षण साहित्य बनवतांना अशा आरोग्य कार्यकर्तीला जे काम करायचे आहे त्यासाठी आवश्यक एवढीच व नेमकी माहिती चित्रमय रूपात देणे, अकारण माहितीचा बोजा टाळणे हे पथ्य ‘साथी’मध्ये आम्ही पाळतो. या पुस्तकासाठीही हेच तत्त्व पाळले आहे.

आम्हाला आशा आहे की तुम्हाला हे पुस्तक मदतकारक होईल. आपली मते व सूचना आपल्या प्रशिक्षकांमार्फत किंवा शक्य असेल तर थेटपणे जरूर कळवा.

१५ ऑगस्ट, २००९ (स्वातंत्र्य दिन)

डॉ. अनंत फडके
साथी

# अनुक्रमणिका


| क्र. | विषय | पान क्र. |
| --- | --- | --- |
| १. | क्षयरोग (टी.बी.) | १ |
| २. | कुष्ठरोग | १३ |
| ३. | मलेरिया/हिवताप | ३२ |
| ४. | जखमेची काळजी | ४५ |
| ५. | कुत्रा किंवा इतर जनावर (प्राणी) चावण्यामुळे होणारी जखम | ५६ |
| ६. | भाजणे | ६४ |
| ७. | आयुष | ७४ |